Gmail

Sumit Kule <kulesumit77@gmail.com>

# महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा-रत्नागिरी येथे कार्यरत कामचुकार सहा. जिल्हा समन्वयक अधिकारी श्री.अमरीश मेस्त्री यांना सेवेतून तत्काळ निलंबित करणे बाबत...

1 message

**Sumit Kule** <kulesumit77@gmail.com> Fri, Mar 28, 2025 at 4:33 PM
To: cm@maharashtra.gov.in, dcm@maharashtra.gov.in, dycm@maharashtra.gov, adm.mavim@gmail.com, "gib.mavim@gmail.com" <gib.mavim@gmail.com>

**विषय :- महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा-रत्नागिरी येथे कार्यरत कामचुकार सहा. जिल्हा समन्वयक अधिकारी श्री.अमरीश मेस्त्री यांना सेवेतून तत्काळ निलंबित करणे बाबत...**

**महोदय ,**

**महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी जिल्हा रत्नागिरी सदर कार्यालयामध्ये कार्यरत असणारे कामचुकार सहा. जिल्हा समन्वयक अधिकारी श्री.अमरीश मेस्त्री यांच्या कामकाजाविषयी अनेक तक्रारी आहेत. मी रत्नगिरी खेड तालुक्यातील स्थानिक रहिवासी आहे आणि माहिती अधिकार कार्यकर्ता सुद्धा आहे रत्नागिरी जिल्हात संबंधित माविम च्या अधिकाऱ्याने गैरकारभाराचा हैदोस माजवला आहे त्या संबंधित सर्विस्तर तक्रार सोबत जोडीत आहे. अशा कामचुकार अधिकाऱ्याला रत्नागिरी जिल्हात कार्यरत ठेवले तर जिल्हातील महिलांचा आर्थिक विकास होणार नाही परिणामी माविम यंत्रणा रत्नागिरी जिल्हात बंद होऊन जाईल तरी सदर विषयाची गंभीर दखल आपण घेऊन उचित निर्णय घ्यावा हि नम्र विनंती.**

**ठिकाण :- रत्नागिरी**

**(कु.सुमित संतोष कुळे )**

**दिनांक :- दि.२८/०३/२०२५**

**माहिती अधिकार कार्यकर्ता, खेड तालुका संपर्क प्रमुख**

**माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य**

**सोबत- सर्विस्तर तक्रार अर्ज जोडीत आहे.**

<Dial 18002666868><Wear mask -Stay safe>
भारतीय डाक India Post
EM576432897IN IVR:6977576432897
SP RATNAGIRI COLLECTORATE S.O <415612>
Counter No:1,28/03/2025,12:25
To:VARSHA LADDHA ,KALANAGAR
PIN:400051, Bandra(East) S.O
From:SUMIT S KULE,VERAL
Wt:54gms
Amt:47.20,Tax:7.20,Amt.Paid:47.00(Cash)

माविम मुख्यालय तक्रार अर्ज.pdf
3170K

YouTube

पोच

कु. सुमित संतोष कुळे
डिप्लोमा + बी एस सी कृषी
माहिती अधिकार कार्यकर्ता.
माहिती अधिकार कार्यकर्ते फेडरेशन महाराष्ट्र राज्य.

पत्ता - मु. पोस्ट - वेरळ, तालुका - खेड, जिल्हा - रत्नागिरी, पिन कोड - 415621 Mob no - 8087270122 / 8956492328 Email - pathpurava100@gmail.com

दि. २८/०३/२०२५

## लेखी तक्रार

प्रति,

मा.श्रीमती वर्षा लढ्ढा मॅडम (I.A.S)
व्यवस्थापकीय संचालक
महिला आर्थिक विकास महामंडळ ,(माविम) मुख्यालय मुंबई

**विषय :- महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा-रत्नागिरी येथे कार्यरत कामचुकार सहा. जिल्हा समन्वयक अधिकारी श्री.अमरीश मेस्त्री यांना सेवेतून तत्काळ निलंबित करणे बाबत...**

महोदया ,

महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी जिल्हा रत्नागिरी सदर कार्यालयामध्ये कार्यरत असणारे कामचुकार सहा. जिल्हा समन्वयक अधिकारी श्री.अमरीश मेस्त्री यांच्या कामकाजाविषयी अनेक तक्रारी आहेत. त्यामध्ये सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रत्नागिरी ,विभाग, कार्यालयात लोक संचलित साधन केंद्र ता.खेड ,रत्नागिरी (न्यास नोंदणी क्र. एफ/४२११ /रत्नागिरी ) या संस्थे मधील अनियमित व घटनाबाह्य कारभार चालत आहे आणि सदर संस्थेवर मानद सल्लागार म्हणून कार्यरत असणारे श्री.अमरीश मेस्त्री यांच्या नजरेसमोर हे सगळे प्रकार घडत असताना संबंधित अधिकारी निव्वळ बघ्याची भूमिका घेत आहे असे कर्तव्य शून्य अधिकारी तत्काळ निलंबित होणे अत्यंत आवश्यक आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी अंतर्गत चालू असलेले लोक संचलित साधन केंद्र यांच्या मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र.२ नुसार सदर संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता – माजी सैनिक विश्राम गृह पंचायत समितीच्या मागे शिवतर रोड खेड ,ता.खेड जिल्हा- रत्नागिरी असा नमूद केलेला आहे परंतु सदरचा पत्ता हा पूर्ण पणे

महसूल सहायक
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
28 MAR 2025



28.03.025
आवक बारनिशी
ई-टपाल कक्ष, जि. का. रत्नागिरी

चुकीचा असून शिवतर रोडच्या मागे पंचायत समिती कार्यालय नाही व त्या पत्तावर कुठेही सदर संस्थेचा कार्यालय नाही तरीही श्री.अमरीश मेस्त्री मानद सल्लागार यावर काहीही बोलत नाहीत.

१. सदरची संस्था महिलांचे आर्थिक विकास व सक्षमीकरण करणे वैगरे वैगेरे काम करणार असल्याचे संस्थेच्या मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील संस्था स्थापनेच्या उद्देशात म्हंटलेले आहे. परंतु सदर संस्थेतील कार्यकारणी यांनी कृषीवर आधारित नाचणी प्रक्रिया करण्यासाठी उद्योग उभारला आहे, सदरचा प्रकल्प संस्थेने एका खाजगी इमारती मधील पार्किंग भागात सेटअप केला आहे ती जागा पूर्ण पणे बेकायदेशीर आहे सदर जागेचा अवैध्य वापर संस्था करीत आहे. सदरचे नाचणी प्रक्रिया युनिट मध्ये प्रक्रिया करण्यासाठी वापरण्यात येत असलेली १० टन नाचणी हि शिव शंभो कृषी सेवा केंद्र (बाहेर जिल्हातील व्यापारी ) यांच्याकडून खरेदी करण्यात आली असून स्थानिक बचत गटातील महिला १० टन नाचणी साफ करून योग्य पॅकिंग तसेच युनिटच्या ठिकाणी पुरविण्यास असमर्थ होत्या अस महिला आर्थिक विकास महामंडळाचे महाराष्ट्र राज्य प्रकल्प व्यवस्थापिका श्रीमती रूपा मेस्त्री यांनी दि.१६-०१-२०२५ रोजीचे पत्रानुसार खुलासा केला आहे यावरून हे सिद्ध होत कि महिलांकडे १० टन नाचणी उपलब्ध असताना निव्वळ त्यांना नाचणी साफ करायला व योग्य पॅकिंग करून सदर नाचणी युनिट ठिकाणी कशी पुरवली जावी याची माहिती सदर संस्था व माविम महिलांना देऊ शकत नसेल तर मुळात स्वत: सक्षम नसलेली सदर संस्था आणि जिल्हा कार्यालय माविम महिलांना सक्षमीकरणाचे धडे देऊ शकत नाही. सदरचे नाचणी युनिट मार्च २०२३ दरम्यान भाडे करार करून घेतलेले आहे दर महिना भाड्याची रक्कम संस्थेच्या खात्यातून वजा होत आहे त्याच्या पश्चात सदरचे युनिट दीड वर्षापासून बंद आहे नाचणी खराब होऊ लागली आहे, शासनाकडून मिळालेल्या मशीन निकामी पडल्या आहेत. सदर युनिट मध्ये नियमित स्वरुपात कोणत्याही महिला काम करत नाहीत (शासनास दाखवण्यापुरते फोटो काढून युनिट चालू आहे असे संस्था भासवीत आहे.) त्यामुळे प्रत्यक्षात महिलांना कोणताही रोजगार या युनिटच्या माध्यमातून उपलब्ध होत नाही सदर व्यवसाय मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसत असताना सदर संस्थेचा उद्देश आहे कि, उद्योजकीय विकास घडवून आणणे. मुळात सदरची संस्थेत कार्यरत असलेली कार्यकारणी स्वत:च कोणत्याही प्रकारे सक्षम नाही कि, घटनेतील उद्देशिकेवर काम करेल.

२. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .५ नुसार लोक संचलित साधन केंद्र ता.खेड ,रत्नागिरी(न्यास नोंदणी क्र. एफ/४२११ /रत्नागिरी ) चे सदस्य जाहीर केलेले आहेत त्यामधील कार्यकारणी मयत आहेत सदर कार्यकारणी मध्ये संस्था

सचिव प्रिया अंकुश कदम , उपाध्यक्ष – संगीता भगवान चव्हाण , अध्यक्ष – सुषमा मनोहर येलवे या अनेक वर्ष संस्थेत येत नाहीत तरी संस्थेचा कारभार घटने विरुद्ध जाऊन चालविला जात आहे सदर संस्था अध्यक्ष , उपाध्यक्ष , सचिव म्हणून घटनेच्या रेकॉर्ड वर नसलेल्या व्यक्ती संस्थेचा आर्थिक व्यवहार चालवत आहेत हे पूर्णपणे घटना बाह्य आहे व संबंधित पदाधिकारी हे बोगस आहेत .

३. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .७ मध्ये नमूद केले आहे कि, सर्वसाधारण सभा दर वर्षी आर्थिक वर्ष संपल्याच्या नंतर (३१ मार्च नंतर) तीन महिन्याच्या आत घेतली जाईल असा नियम असताना संस्थेच्या घटनेत विहित केलेल्या कालावधीत सदरची सभा होत नाही. २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील सर्वसाधारण सभा झालीच नाही. सदर सर्वसाधारण सभेचे अधिकार पुढील प्रमाणे आहेत त्यात १. सर्वसाधारण सभेत वार्षिक हिशोब मंजूर करणे, २.कार्यकारणी समिती सदस्यांची निवड करणे इत्यादीं गोष्टी होत नाहीत.

४. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .८ मध्ये नमूद केले प्रमाणे सर्वसाधारण सभेची नोटीस पंधरा दिवस अगोदर सर्व सभासदांना स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या नावे काढीत नाहीत व सदरची नोटीस कार्यालयाच्या बाहेर नोटीस बोर्डवर लावली जात नाही कारण संस्थेचा कार्यालय संस्थेच्या घटनेतील नमूद केलेल्या पत्यावर नाहीच आहे.

५. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .१० व ११ मध्ये नमूद केले प्रमाणे CMRC कार्यकारणी समितीवरील सदस्य मतदानाच्या माध्यमातून निवडून आल्या नंतर त्यांना पदाधिकार दिले जातात परंतु सध्या बरेच अशा व्यक्ती आहेत त्यांची कायदेशीर नेमणूक न होताच त्यांना संस्थेचे पदाधिकारी म्हणून घेतलेले आहे त्याची नेमणूक बोगस आहे .

६. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .१२ मध्ये नमूद केल्या नुसार संस्था अध्यक्ष या काही काम करीत नाही शिवाय त्या नियमानुसार सभा घेत नाहीत त्याच्याशी सबंधित असलेले काही काम संस्था अध्यक्ष करीत नाहीत.

७. संस्था कार्यकारी समिती उपाध्यक्ष या सुद्धा उपस्थित नसतात व काही काम करीत नाहीत.

८. संस्था कार्यकारी समिती सचिव या सुद्धा उपस्थित नसतात व काही काम करीत नाहीत.

९. संस्था कार्यकारी समिती सहसचिव या सुद्धा उपस्थित नसतात व काही काम करीत नाहीत.

१०. संस्था कार्यकारी समिती कोषाध्यक्ष या सुद्धा उपस्थित नसतात व काही काम करीत नाहीत.

११. संस्था कार्यकारी समिती मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी या विभागातील जिल्हा समन्वयक अधिकारी हे सदर संस्थेचे मानद सल्लागार सदस्य आहेत संस्थेच्या कार्यकारणी समितीस सर्व प्रकारचे मार्गदर्शन करणे हे मानद सल्लागार सदस्य यांची कायदेशीर जबाबदारी असताना त्यांनी कोणत्याही प्रकारे सदरील जबाबदारी पार पाडली नाही.

१२. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .१२ मध्ये व्यवस्थापक यांची कामे दिलेली आहेत. त्यामध्ये लोकसंचलीत साधन केंद्राचे दैनंदिन प्रशासकीय व वित्तीय व्यवस्थापन करणे, लोकसंचलीत साधन केंद्राचा दर वर्षीचा कृती आराखडा व अंदाजपत्रक तयार करून कार्यकारणी समोर ठेवणे व मंजुरी नंतर जिल्हा समन्वयक अधिकारी माविम कार्यालयाची मंजुरी घेणे., लोकसंचलीत साधन केंद्राचे लेखे तपासणीसांकडून तपासणी करून घेऊन कार्यकारणी समिती समोर मंजुरीस्तव ठेवणे व वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करून घेणे ., प्रशासकीय, आर्थिक तसेच कार्यक्रम या सर्व अंगाने यशस्वी अंमलबजावणी करणे, व्यवस्थापन करणे , सहयोगिनी सनियंत्रण करणे व संस्थेच्या कायदेशीर घटकांची पूर्तता करणे. इत्यार्दी कोणत्याही प्रकारचा काम सध्या कार्यरत असणाऱ्या व्यवस्थापिका करीत नाहीत जिल्हा समन्वयक अधिकारी माविम , लेखाधिकारी माविम यांच्या पत्रव्यवहारांना कोणत्याही प्रकारचा प्रतिउत्तर 'CMRC' व्यवस्थापिका देत नाही व 'CMRC' अध्यक्ष सुद्धा कोणते प्रकारे कायद्याचे गांभीर्य नसल्या प्रमाणे काहीच काम करीत नाही.

१३. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .१३ मध्ये नमूद केल्या नुसार कार्यकारणी समिती सदस्यांमधून निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची दर महा बैठक होणे बंधनकारक असताना अशी सभा होत नाही.त्याच प्रमाणे संपूर्ण कार्यकारणी समितीची बैठक दर तीन महिन्यातून एकदा होईल असे घटनेत नमूद असताना नियमित सभा होत नाहीत.

१४. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .१६ मध्ये नमूद केल्या नुसार कार्यकारणी समितीमधील रिक्त पद भरण्या बाबत तरतूद केली आहे परंतु सदर संस्थेत बहुतांशी कार्यकारणी कागदावर आहेत प्रत्यक्षात येत नाही , काही मयत आहेत तरी नियमानुसार त्यांची पद भरलेली नाहीत व मयत व्यक्तीं पश्चात संस्थेचे आर्थिक व्यवहार बिना संमती चालत आहेत.

१५. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .१७ मध्ये नमूद केल्या नुसार कार्यकारणी समिती तिचे कोणतेच अधिकार व कर्तव्य बजावत नाही.

१६. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र .१८ व १९ नुसार संस्थेला मिळत असलेला निधी व खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता संस्था कार्यकारणी करीत आहे.

१७. संस्थेचा मेमोरॅडम ऑफ असोसिएशन मधील मुद्दा क्र. २१ नुसार स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्याची तरतूद केलीली आहे त्यामध्ये स्थावर मालमत्ता खरेदी करताना सदर संस्थेने नियमानुसार मा.धर्मादाय सह. आयुक्त कोल्हापूर यांची पूर्व परवानगी घेतली नाही या प्रकरणा बाबत दि.१६/०३/२०२३ रोजीचे श्री.प्रवीण दिनकर पाटील ,लेखाधिकारी , महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी यांचे 'CMRC जागा खरेदी संदर्भात श्रीमती दीप्ती संजय सावंत यांना दिलेले आर्थिक प्रशासकीय कारवाई बाबत चे पत्र '. सदरचे पत्र दि.१६/०३/२०२३ रोजी श्रीमती दीप्ती संजय सावंत यांना दिलेले आहे तसेच सदरचे दि.१६/०३/२०२३ चे पत्र श्रीमती अपर्णा महाडिक खेड CMRC यांना माहितीसाठी दिलेले आहे यावर काहीच कारवाई केली नाही याचा कोणताही पाठपुरावा संबंधित जिल्हा समन्वयक अधिकारी यांनी केलेला नाही.

१८. दि .३०/०५/२०२३ रोजी श्री.अमरीश मेस्त्री अ. जिल्हा समन्वयक अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी यांनी CMRC व्यवस्थापिका श्रीमती दीप्ती संजय सावंत यांना घरघंटी शिलाई मशीन घोटाळा किवा महिलांची झालेली फसवणूक या बाबत खुलासा सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत सदर संस्था कार्यकारणी यांनी व्यवस्थापिका यांना पाठीशी घालत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. याचा कोणताही पाठपुरावा संबंधित जिल्हा समन्वयक अधिकारी यांनी केलेला नाही.

१९. दि.०३/०९/२०२३ रोजीचे पत्रानुसार श्रीमती अपर्णा महाडिक CMRC खेड यांना जिल्हा समन्वयक अधिकारी (अ.का.) यांनी CMRC मधील महिलांची घरघंटी तसेच शिलाई मशीन आणि घरकुल च्या नावाखाली झालेली आर्थिक फसवणुकी बाबत. या प्रकरणात लोक संचलित साधन केंद्र खेड मधील कर्मचारी श्रीमती दीक्षा माने (सहयोगिनी ) यांनी चिपळूण मधील तसेच खेड तालुक्यातील किमान ४०० महिलांची

फसवणूक केली आहे व हा सर्व प्रकरण लोक संचलित साधन केंद्र खेड मधील कर्मचारी श्रीमती दीप्ती संजय सावंत यांच्या मंजुरुने झाला असल्याचे समजते असा सुस्पष्ट प्रशासकीय आदेश लिहून सदरचा आदेश योग्य त्या कारवाई साठी श्रीमती अपर्णा महाडिक CMRC खेड यांना सादर केला आहे त्यावर संस्था कार्यकारणी यांनी काहीच कारवाई केली नाही व गुन्हेगारांना पाठीशी घातले आहे म्हणून अशी संस्था बंद होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

२०. मा.जिल्हा समन्वयक अधिकारी (अ.का.) महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी , हे सदर संस्थेची घटनेमध्ये नमूद केले नुसार मानद सल्लागार म्हणून संस्थेचा सदस्य आहे. तसेच ते जिल्हा स्तरावरील अधिकारी असल्या कारणाने त्यांना परिपूर्ण माहिती आहे सदर संस्थेच्या घटनेत नमूद केले नुसार लोकसंचलीत साधन केंद्राच्या कार्यकारणी समितीस सर्व प्रकारचे मार्गदर्शन करणे व लोक संचालित साधन केंद्राच्या कार्यकारणी समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी लोक हितकारक होते आहे किंवा कसे या बाबत लक्ष ठेवून वेळ प्रसंगी त्या संबंधित समितीस व व्यवस्थापकास सूचना करणे. कार्यकारणी समितीच्या बैठकीस दर महा उपस्थित राहणे इत्यार्दी कायदेशीर बाबी किंवा त्यांच्या संबंधित असलेले कार्य व कर्तव्य , जबाबदारी त्यांनी मानद सल्लागार सदस्य पदावर असताना पार पाडली नाहीत म्हणून ते दोषी आहेत.

२१. महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी कार्यालय अंतर्गत चार CMRC आहेत चारही CMRC मध्ये चालू असलेले उपप्रकल्प आर्थिक तोट्यामध्ये आहेत त्या संदर्भात कोणतेही कागदपत्र जिल्हा कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत. सदर उप प्रकल्पाचे सर्विस्तर प्रकल्प अहवालाची माहिती अधिकारात मागणी केल्यास ते देखील नाही मागील 3/४ वर्षापासून हे उप प्रकल्प निव्वळ दाखवण्या पुरते राबविण्यात येत आहेत.

२२. जिल्हा समन्वयक अधिकारी यांच्या जबादाऱ्या आहेत कि,
जिल्हा समन्वय अधिकारी
जबाबदा-या :-

- जिल्हा समन्वय अधिकारी हा जिल्हयातील कार्यकम, प्रशासन व लेखा या सर्व विभागांचा प्रमुख्य असून जिल्हा कार्यालय स्वबळावर कार्यरत ठेवून महिलांचा निकास घडवून आणणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे.
- संपूर्ण जिल्हयाच्या कामाचे नियोजन करणे.
- संपूर्ण जिल्हयात असलेल्या प्रकल्पाच्या कामाची अंमलबजावणी करणे.
- शासकीय, निमशासकीय त स्वयंसेवी संम्यांशी समन्वय ठेवणे.
- प्रकल्पाच्या कामाचे संनियंत्रण करणे.
- एसजीएसवाग सारख्या व इतर गोजनांची कामे मिळविणणे
- नोराड/स्टेप योजनेचे प्रस्ताव तयार करुन पाठविणे (माविम व स्वयंसेवी संस्थांचे.)
- संस्थांना भेटी देऊन नोराड/स्टेप योजनेचे संनियंत्रण करणे.
- कामधेनू योजनेची अंमलबजावणी करणे.
- आर्थिक उलाढालीवर संनियंत्रण ठेवणे
- भौतिक प्रगतीवर संनियंत्रण ठेवणे, तसंच आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल मुख्यालयास विहित मुदतीत दरमहा पाठविणे.
- मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे.
- प्रदशने आयोजित करुन महिलांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने कार्यवाह करणे.
- साधनव्यक्ती म्हणून कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत राहाणे
- यंत्रणेतील कर्मचारी/अधिकारी यांच्या कामाचे संनियत्रण करणे व वेळोवेळी त्यांना योग्य मार्गदर्शन करणे. त्यांच्या क्षमता विकसित करणे.
- मासिक बैठक आयोजित करणे.
- कार्यक्षेत्रीय भेटी देणे.

- कामाचे डॉक्युमेन्टेशन करणे.
- महिन्यातून किमान १५ दिवस भेटी देणे.

यातील कोणत्याही जबाबदाऱ्या अतिरिक्त कार्यभार असणारे जिल्हा समन्वयक अधिकारी श्री. अमरीश मेस्त्री पाळत नाहीत अशा कर्तव्य शून्य अधिकाऱ्यास अद्याप सेवेत ठेऊन महिला आर्थिक विकास महामंडळ यांस काय साध्य करायचे आहे असा प्रश्न निर्माण होत आहे.

२३. महिला आर्थिक विकास महामंडळ रत्नागिरी , येथील जिल्हा समन्वयक अधिकारी यांचे कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी विभाग समन्वयक मा.श्री. मंगेश सूर्यवंशी कार्यरत होते त्यांनी ज्या आढावा बैठका घेतल्या त्यामध्ये वरील अनियमित प्रकाराकडे त्यांनी दुर्लक्ष का केले ? तसेच रत्नागिरी जिल्हामध्ये विभाग समन्वयक मा.श्री. मंगेश सूर्यवंशी यांच्या किती भेटी झाल्या त्या भेटींचा अहवाल , भेटी दरम्यान झालेला खर्च इत्यार्दी बाबींची सखोल चौकशी होणे अपेक्षित आहे.

२४. त्याच प्रमाणे आपल्या मुंबई मुख्यालय विभागात येऊन मी मा.रूपा मेस्त्री, प्रकल्प व्यवस्थापक माविम मुख्यालय मुंबई , मा.श्री.महेंद्र गमरे साहेब , जनरल मॅनेजर (प्रोजेक्ट) , माविम मुख्यालय मुंबई यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सगळा प्रकार सांगितला असून मी कारवाई करण्याची तोंडी विनंती देखील केली होती परंतु सदर प्रकरणावर ज्या प्रकारे टाळाटाळ होत आहे त्यावर असे म्हणणे वावगे ठरणार नाही कि जिल्हा समन्वयक अधिकारी रत्नागिरी अमरीश मेस्त्री यांच्या अनियमित कामकाजात त्यांना साथ देण्यासाठी आपल्या मुख्यालयातील अधिकाऱ्यांची साथ होती का ? त्यामुळे सदर पत्राच्या अनुषंगाने आपण योग्य ती कारवाई कराल अशी अपेक्षा करून मी आपणास पत्र लिहित आहे या प्रकरणावर व आपण करीत असलेल्या कारवाई वर संपूर्ण महाराष्ट्रच लक्ष लागून राहिले आहे म्हणून सदर विषयाची गंभीर दखल घेऊन तत्काळ दोषींवर कारवाई करावी हि नम्र विनंती.

सबब तक्रारदार म्हणून माझी विनंती अशी कि,

अ ) वर नमूद केलीली तक्रार अतिशय गंभीर आहे व हजारो महिलांचा विकास यांसारख्या अतिसंवेदनशील विषयाशी निगडीत असल्या कारणाने निश्चित लोकसंचलित साधन केंद्र खेड, आणि श्री.अमरीश मेस्त्री यांचा कामचुकारपणा महिल आर्थिक विकासावर अन्याय करीत आहे त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी.

ब) जिल्हा-रत्नागिरी येथे कार्यरत कामचुकार सहा. जिल्हा समन्वयक अधिकारी श्री.अमरीश मेस्त्री यांना तत्काळ निलंबित करणेची कारवाई व्हावी.

ड)सदर प्रकरणाचा निकाल लागे पर्यंत लोकसंचलित साधन केंद्र खेड, या संस्थेचे चालू असलेले सर्व आर्थिक व्यवहार थांबविण्याचे प्राथमिक आदेश व्हावेत. विनंती.

(कु.सुमित संतोष कुळे )

ठिकाण :- मुंबई

दिनांक :- दि. २८/०३/२५

माहिती अधिकार कार्यकर्ता, खेड तालुका संपर्क प्रमुख

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य

**REG- U85300MH2022NPL383632**

प्रत कारवाई साठी सादर ,

१. मा.श्री.देवेंद्र फडणवीस साहेब, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.
२. मा.श्री.एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.
३. मा.श्री.अजित पवार साहेब, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.
४. मा. नामदार कु.अदिती तटकरे मॅडम, महिला व बाल विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य.
५. मा. नामदार श्रीमती मेघना बोर्डीकर, महिला व बाल विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य.
६. मा. नामदार श्री. उदय सामंत साहेब मराठी भाषा व उद्योग मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री महाराष्ट्र राज्य.
७. मा. नामदार श्री.योगेश कदम साहेब गृह राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य.
८. मा.आमदार श्री.किरण (भैय्या ) सामंत साहेब.